International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्री-विषयक दृष्टिकोन

## प्रा. सुलोचना एस. लांजेवार

इतिहास विभाग प्रमुख
अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ

मध्ययुगीन महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेली मराठी सत्ता ही तत्कालीन परिवेषातील सर्वस्वी भिन्न स्वरूपाची होती. महाराजांचा इतिहास जेवढा ढाल तलवारीचा आहे, त्यापेक्षा अधिक रचनात्मक कार्याचा, परिवर्तनाचा, सामाजिक न्यायाचा व स्त्री-स्वातंत्र्याचा इतिहास आहे. 17 व्या शतकात शिवाजी महाराजांचा स्त्री-विषयक दृष्टिकोन आजच्या 21 व्या शतकातदेखील दीपस्तंभासारखा आहे.

**शिवकालीन स्त्रियांची स्थिती** :- शिवाजी महाराजांच्या काळात आणि सरंजामशाहीच्या काळात एकूणच स्त्रियांच्या अब्रूला विशेषत: गोरगरिबांच्या स्त्रियांच्या अब्रूला काडीचीही किंमत नव्हती. राजेरजवाडे, राजपुत्र, वतनदार, सरदार, जमीनदार, देशमुख-पाटील यांच्या दृष्टीने रयतेच्या ह्या स्त्रिया म्हणजे त्यांना हव्या त्या वेळी उपभोगण्याची वस्तू होत्या. ज्याच्याकडे दाद मागायची तेच अब्रू लुटत असे.

' सर्व प्रश्न तलवारीने सुटत असतात ' अशी मध्ययुगीन समाजाची मानसिकता होती. इतिहास असा सांगतो की, ज्या-ज्या काळात तलवारीला महत्त्व चढले त्या-त्या काळात स्त्रियांच्या दैन्यावस्थेत आणखीच भर पडत गेली. एखादा राजा, सरंजामदार किंवा जहागी रदार प्रति पक्षाकडून युद्धात पराभूत झाला की, त्याच्या कुटुंबातील स्त्रियांची विटंबना ही ठरलेलीच असे.

सुलतान काळापासून चालत आलेला स्त्री-विषयक दृष्टिकोन मोगल काळातही फारसा बदललेला नाही. तत्कालीन प्रसिद्ध इटालियन प्रवासी निकोलाय मनुची म्हणतो, " महालात सर्वांची सेवा करण्यासाठी विविध जातीच्या दोन हजार स्त्रिया आहेत.'' तर काहींच्या मते, "मोगल सम्राटांच्या जनानखान्यात 5000 पर्यंत स्त्रिया होत्या आणि त्यासाठी स्वतंत्र विभाग कार्यरत होते ''. म्हणजे सत्ताधीश बदलले पण स्त्री- विषयक दृष्टिकोनात मात्र बदल झाला नाही. या काळात हत्ती, घोडे, उंट या मुक्या प्राण्यांना जेवढे महत्त्व होते तेवढेही महत्त्व स्त्रियांना नव्हते. अशा ह्या काळात शिवाजी महाराजांनी स्त्रियांना मोठ्या प्रमाणात सन्मानाची वागणूक दिली.

**शिवरायांचा स्त्रियांप्रती असलेला उदार दृष्टिकोन:-** " आमच्या मुजरयाचा पहिला मान स्त्री जातीचा आहे, ती आई आहे ''. स्त्री स्वतःच्या घरातील असो वा समाजातील माता-भगिनी असोत, महाराजांनी प्रत्येक स्त्रीला देवघरातील देवाइतकेच महत्त्व दिले होते. स्त्रीचा मान-सन्मान, आदर करणे ही आपली हिंदू संस्कृती आहे. स्त्रीला आपल्याकडून दिल्या गेलेल्या वर्तणूकीद्वारे आपला सांस्कृतिक दर्जा ठरत असतो. ज्या ठिकाणी स्त्रियांना पूज्य मानले जाते तेथेच देवाचे वास्तव्य असते ( " यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता '') याच न्यायाने महाराजांनी स्त्रियांची प्रतिष्ठा जपली. कोणत्याही

युद्धात महाराज किंवा महाराजांच्या सैनिकांकडून स्त्रियांना उपद्रव झालेला नाही. स्त्रियांची इज्जत, प्रतिष्ठा, मान, आदर जपण्याचा महाराजांनी आटोकाट प्रयत्न केलेला आहे. स्त्री ही कोणत्याही जाती-धर्माची असो तिला महाराजांनी देवता मानले आहे.

**शिवरायांचे मूळ प्रेरणास्थान जिजामाताच-** शिवाजी महाराजांनी भारतीय इतिहासात जे युग परिवर्तनिय कार्य केले त्याची मूळ प्रेरणा त्यांना जिजामातेकडून मिळाली. मुस्लिम अत्याचारापासून देशाला मुक्त करण्याचे शिक्षण तिने शिवाजीला दिले.मोगलांच्या जोखडातून एतद्देशीयांना मुक्त करायचे असेल तर स्वराज्य निर्मितीशिवाय पर्याय नाही ही शिकवण जिजाऊंनीं शिवाजी महाराजांना दिली आणि आपल्या मातेच्या या शिकवणुकीमुळेच शिवाजींचा स्त्री-विषयक दृष्टिकोन अत्यंत उदार बनला.

शिवाजी महाराजांनी आपल्या मातेचा म्हणजेच राजमाता जिजाऊ साहेबांचा प्रत्येक शब्द शिरसावंद्य मानला. याबाबत बा. सी. बेंद्रे म्हणतात, "जहागिरीची सांभाळणूक वगैरेतील शिक्षणानुभव शिवाजी महाराजांस त्यांच्या मातेकडूनच मिळाले होते आणि मोठे झाल्यावरही शिवाजी महाराज आपल्या मातेच्या मार्गदर्शनाची अपेक्षा करीत होते." राज्याभिषेक प्रसंगी शिवरायांनी राजमाता जिजाऊंना सन्मानाने मानाच्या आसनावर बसविले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शेवटपर्यंत राज्यकारभार केला.

आद्य शिवचरित्रकार कृष्णाजी अर्जुन केळुस्कर त्यांच्या 'छत्रपती शिवाजी महाराज ' या ग्रंथात लिहितात, " जिजाऊंच्या प्रभावाने महाराजांच्या मनात स्वातंत्र्याची प्रीती विकसित झाली.''

शिवरायांचे स्वराज्य म्हणजे मातृसत्ताक कुटुंबपद्धतीचा एक आदर्श आहे. आपल्या मातेचा आदर करणारे शिवाजी राजे महिलांच्या विचारांचा, सल्ल्यांचा सन्मान करणारे राजे होते.

**काही उदाहरणांवरून महाराजांच्या स्त्री-विषयक धोरणावर प्रकाश टाकता येतो-**

**कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेचे प्रकरण** :- शिवाजी महाराजांच्या सैन्याला कल्याणच्या सुभेदाराची सुन सापडली. अत्यंत लावण्यवती असलेल्या या स्त्रीला आबाजी सोनदेव या सरदाराने महाराजांच्या दरबारात आणून पडद्याच्या आड उभे केले आणि महाराजांना सांगितले की, आपल्यासाठी एक सुंदर भेटवस्तू आणली आहे. महाराज म्हणाले, मग ती भेटवस्तू दरबारात दाखवावी. तेव्हा आबाजी सोनदेवाने कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला दरबारापुढे उभे केले. त्याबद्दल महाराजांनी आबाजी सोनदेवास जबर शिक्षा केली व त्या स्त्रीचा मान- सन्मान करून तिला चोळी – बांगडी देऊन मानाने तिच्या घरी पोहोचती करण्याची व्यवस्था केली.

मुस्लिम शत्रूची तरुण सुन पाहून आईची आठवण व्हावी अन् 'आपलीही आई इतकी सुंदर असती तर काय झाले असते ' असे उद्गार निघावेत यासाठी चारित्र्यसंपन्न आणि सौंदर्यासंबंधीचा निरोगी दृष्टिकोन असावा लागतो जो महाराजांकडे होता.

सैय्यद अमीन हा लेखक आपल्या 'महापुरुष शिवाजी ' या ग्रंथात म्हणतो की, " सुभेदाराच्या सुनेस जी वागणूक शिवाजी महाराजांनी दिली त्यामुळे त्यांच्या चारित्र्य संपन्नतेची सर्वत्र चर्चा होऊ लागली. मुस्लिमांना तर त्यांच्याबद्दल खूप आदर

वाटू लागला. शत्रुपक्षातील स्त्रीला आपल्या जनानखान्यात नेण्याची त्यावेळी प्रथा ? पण शिवाजी महाराजांनी ती प्रथा झुगारून एक महान आदर्श निर्माण केला."

मुघलांचा इतिहासकार खाफीखान शिवाजीच्या धवल चारित्र्याला सलाम ठोकताना आदराने नमूद करतो की, " मुसलमान स्त्रिया हस्तगत झाल्यास त्यांना सन्मानपूर्वक त्यांच्या आप्तेष्टांकडे पाठवावे असा शिवाजींचा सक्त आदेश असे आणि त्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यास तात्काळ कठोर शिक्षा ठोठावण्यात येत असे."

**रायबाघन** - उंबरखिंडीच्या लढाईत शाहिस्तेखानाचा सरदार कारतलबखान पराभूत झाला व त्याला शिवाजीला शरण येणे भाग पडले. त्याच्याबरोबर उदाराम देशमुख यांची पत्नी होती ती कारतलब खानाच्या बाजूने शिवरायाविरुद्ध लढली. परंतु कारतलबखान शरण आल्यानंतर शिवरायांनी रायबाघनचा अनादर केला नाही. आपल्या कचाट्यात सापडलेल्याया स्त्रीला देखील महाराज आणि त्यांच्या सैनिकांनी कोणत्याही प्रकारचा उपद्रव दिला नाही. तिलाही त्यांनी सुखरूपपणे तिच्या घरी पोहोचविले.

डॉ. बाळकृष्ण म्हणतात, " शिवाजी महाराजांच्या राज्यात व परराज्यातील मोहिमांमध्ये स्त्रियांना नेहमीच आदराने वागवले जाई. स्त्रियांना कैद करायला बंदी होती. त्यांना अत्यंत सन्मानाने वागवले जात असे ".

**सावित्रीबाई देसाई** - छत्रपती शिवाजी महाराज कर्नाटकच्या मोहिमेवरून परत येत असताना त्यांनी कर्नाटकातील गदग प्रांतातील बेलवाडी किल्ल्यास वेढा घातला बेलवाडीचा किल्लेदार येसाजी प्रभु देसाई मराठ्यांकडून मारला गेला तेव्हा त्याची विधवा पत्नी मल्लाबाई देसाईने स्त्री सैन्यासह 27 दिवस मराठ्यांचा प्रतिकार केला.पण नंतर ती मराठ्यांना शरण आली. शिवरायांचा सरदार सकुजी गायकवाड याने विजयाच्या उन्मादात शरण आलेल्या स्त्री सैनिकांशी वाईट वर्तन केले. म्हणून महाराजांनी त्याचे दोन्ही डोळे काढण्याची शिक्षा दिली व त्याला मानवली गावी कैदेत ठेवले. आपला सेनापती कितीही शूर असला तरीही त्याने केलेल्या गुन्ह्यासाठी महाराजांनी त्याची गय केली नाही. राजकीय संघर्षात महिलांचा अनादर होणार नाही याची दक्षता शिवाजी महाराजांनी घेतली होती.

पती निधनानंतर राज्याच्या रक्षणासाठी पराक्रम गाजविणाऱ्या मल्लाबाईस शिवरायांनी 'सावित्रीबाई' हा किताब दिला. तिचे गदग राज्य तिला परत दिले. सावित्रीबाईंनी यादवाड परिसरात घराच्या दरवाज्यावर व मंदिरांसमोर शिवरायांची दगडी शिल्पे कोरलेली आहेत. तसेच सावित्रीबाईच्या लहान बाळाला मांडीवर बसवून दूध पाजण्याचे शिल्प आजदेखील यादवाडला पाहावयास मिळते.

**हिरकणी**- रायगडाच्या पायथ्याशी राहणारी हिरकणी नावाची गवळण आपल्या काही गवळणींसोबत कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी दुध विकण्यासाठी गडावर आली. स्वराज्याच्या नियमाप्रमाणे संध्याकाळ होताच गडाचे दरवाजे बंद झाले आणि एकदा दरवाजे बंद झाले की मग ते कुणासाठीही उघडले जात नव्हते. स्वराज्याचा हा नियम अतिशय कडक होता. आपल्या तान्ह्या बाळासाठी अत्यंत कासावीस झालेल्या हिरकणीने रायगडाचा हा भिषण कडा उतरून येण्याचे असामान्य धाडस केले. रायगडाचा हा भिषण कडा म्हणजे जणू यमराजाचीच पाठ होती. मात्र हिरकणीने मुलाच्या विलक्षण ओढीने हा कडा उतरून जाण्याचे धाडस केले व ती रायगडाच्या पायथ्याशी पोहोचली. शिवरायांना ही वार्ता कळताच त्यांना हिरकणीच मोठं कौतुक वाटलं व ते हिरकणीला म्हणाले, " अति उंच आणि कठीण असा कडा उतरून बाळाच्या

ओढीने घरी जाणारी तुमच्यासारखी निर्भिड आई जोपर्यंत आपल्या राज्यात आहे, तोपर्यंत आपले स्वराज्य कोणालाही जिंकता येणार नाही."

ज्या स्वराज्यात हिरकणीसारख्या माता जन्मल्या होत्या ते स्वराज्य वर्धिष्णू होणार यात शंकाच नव्हती. शिवरायांनी मोठ्या कौतुकाने साडी-चोळी देऊन हिरकणीचा गौरव केला. तिच्या गौरवार्थ ज्या गडावरून ती खाली उतरून गेली त्यावर एक बुरूज बांधले व त्या बुरुजाला " हिरकणी बुरूज " असे नाव दिले.

हिरकणीच्या प्रकरणावरून शिवकाळात महिला निर्भीडपणे उद्योग-व्यवसाय करत होत्या हे दिसून येते. हिरकणीचे उदाहरण महाराजांचा स्त्रियांच्या कर्तृत्वाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन दाखवणारे आहे.

**बाबाजी भिकाजी गूजर पाटलास केलेली शिक्षा** - स्वराज्य निर्माण करण्याच्या अगोदरच्या काळात रांझे गावचा पाटील बाबाजी भिकाजी गुजर याने एका परस्त्रीवर जबरदस्ती केली. परस्त्रीला आई मानणाऱ्या शिवरायांच्या मुलुखात पाटलासारख्या एका जबाबदार अधिकाऱ्याने हे कृत्य केल्याचे समजताच महाराज संतप्त झाले. महाराजांनी पाटलाला बोलावून घेतले पण त्याच्या वर्तनात त्यांना गुर्मी दिसून आली म्हणून महाराजांनी विचार केला की, स्वराज्याच्या जन्माच्या अगोदरच आपले अधिकारी असे हलकट चाळे करतील तर स्वराज्य निर्माण झाल्यावर काय करतील ?

महाराजांनी पाटलास त्यांच्यासमोर हजर राहण्यास सांगितले. त्यानंतर गुन्ह्याची रितसर चौकशी केली. पाटलावरील गुन्हा सिद्ध झाला आणि शिवरायांनी " पाटलाचे कोपरापासून दोन्ही हात व गुडघ्यापासून दोन्ही पाय तोडून टाकायचा " कडकडून हुकूम सोडला. शिवाय पाटलाची पिढीजात पाटीलकी जप्त केली.

महाराजांनी गुन्हेगारास कठोर शासन केले असले तरी, त्यातून त्यांचा स्त्रियांबद्दलचा आदरच दिसून येतो. महाराजांना घडविले ते एका स्त्रीनेच. त्यामुळे समाजातील माता-भगिनीबद्दल त्यांच्या मनात नितांत आदर होता. स्वराज्यामध्ये स्त्रियांचा फार मान होता. तिचा अपमान मुळीच खपवून घेतला जात नसे. स्त्रियांच्या सन्मानासाठी, संरक्षणासाठी शिवराय नेहमीच दक्ष असे.

शिवाजी महाराजांच्या स्त्री-विषयक धोरणामुळेच नंतरच्या काळात संभाजी राजांच्या महाराणी येसूबाई व राजाराम महाराजांच्या महाराणी ताराबाई या स्वराज्याच्या रक्षणासाठी निर्भीडपणे पुढे आल्या. महाराणी ताराबाई यांनी तर हातात तलवार घेऊन रणांगणात उतरून औरंगजेबाला सळो की पळो करून सोडले. राणीसाहेब येसुबाईने उत्तम प्रकारे प्रशासन चालविले. त्या स्वराज्याच्या कुलमुखत्यार होत्या. (आधुनिक काळातील राष्ट्रपतीसारखे पद) शिवरायांच्या उदार, उदात्त स्त्री-धोरणामुळेच महाराणी ताराबाई आणि येसूबाई राणीसाहेब कर्तृत्व गाजवू शकल्या.

**शिवरायांच्या लष्करातील स्त्रियांबाबतचे कडक नियम-** 1)महाराजांच्या सैन्यात कोणत्याही स्त्रीला कोणत्याही नात्याने प्रवेश नसे.

2) पत्नी, रखेल, कुणबीण किंवा नाची म्हणून देखील स्त्रिया सैनिकांच्या संपर्कात येत नसत.

3) शत्रुच्या मूलुखातून स्त्रियांना कैदी म्हणून आणण्याची परवानगी नव्हती.

4) स्त्रीला कदापिही उपभोगाची अथवा करमणुकीची वस्तू मानता कामा नये. हे न पाळणाऱ्यास कडक असे शासन असे.

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

यामध्ये शिवरायांचा स्त्री-विषयक उदात्त दृष्टिकोन व त्यांचे अति धवल चारित्र्य सूर्यप्रकाशाप्रमाणे प्रत्ययास येते.

ग्रॅण्ट डफने आपल्या ग्रंथात नमूद केले आहे की, 'शिवाजी राजांनी सुरतेवर हल्ला चढविल्यानंतर तेथील काही लोक स्त्रियांचा वेश करून पळून जाऊ लागले याचे कारण राजांची माणसं स्त्रियांना सुखरूप जाऊ देत, त्यांना त्रास देत नसत किंवा पकडत नसत हे होय.'

**निष्कर्ष :**- छत्रपती शिवरायांनी सावित्रीबाई देसाई, रायबाघन या विरोधात लढणाऱ्या स्त्रियांचा देखील महिला म्हणून आदर केला. विरोधकांशी अत्यंत नैतिकतेने लढणारा राजा म्हणजे शिवाजी होय. शिवरायांनी स्त्रियांचे संरक्षण, सन्मान तर केलाच पण त्यांना स्थावर, जंगम मालमत्तेचे अधिकारही दिले. स्त्री ही ' चूल व मूल ' ह्या परिघातच असावी अशी शिवरायांची भूमिका नव्हती. ' गोब्राह्मण प्रतिपालक ' असा गौरव केला जाणारे शिवाजी महाराज केवळ गाय व ब्राह्मणांचेच पालक नव्हते तर आपल्या राज्यातील स्त्रियांचेही शिवराय पालक होते हे त्यांच्या स्त्री-विषयक विशाल दृष्टिकोनातून स्पष्ट होते.

एकूणच, मध्ययुगीन भारताच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजांसारखा स्त्रियांप्रती एवढा विशाल दृष्टिकोन असणारा ' जाणता राजा ' या सबंध काळात कोणी झाला नाही, असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरणार नाही.'

**संदर्भसूची ;**


1) आचार्य, धनंजय -मराठा सत्तेचा उदय, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2007

2) बेंद्रे, वा. सी. श्री शिवाजी महाराजांचे विचिकित्सक चरित्र

3) बाचुळकर, अशोक -छत्रपती शिवाजी, श्रुती पब्लिकेशन्स, जयपूर, 2006

4) चव्हाण, रा.ना.- शककर्ते श्री राजा शिवछत्रपती, पुणे, 2007 5) गाठाळ, एस.एस. - मराठ्यांचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, 2010

6) जगताप, पी.एस.- रयतेचा राजा शिवछत्रपती, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, 2016

7) केळुसकर, अ. कृ.-छत्रपती शिवाजी महाराज

8) मोरे, दिनेश- शिवरायांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, 2004

9) मेहेंदळे, गजानन भास्कर - श्रीराजा शिवछत्रपती खंड -1 , डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, 2008

10) मार्डीकर, मदन - मराठ्यांचा इतिहास ,विद्या बुक्स, पब्लिकेशन्स, औरंगाबाद, 2008

11) पवार, जयसिंगराव -छत्रपती शिवाजी महाराज, अरुंधती प्रकाशन, कोल्हापूर

12) शेजवलकर, त्र्यं.श.- श्री शिवछत्रपती, मराठा मंदिर, मुंबई